आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

१४ नोव्हेंबर २०२४ - गुरुवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- राज्यविधानसभा निवडणुकीसाठी सर्व पक्षांचा प्रचाराचा धडाका
- भाजपाचे ज्येष्ठ नेते प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची छत्रपती संभाजीनगरमधे सभा सुरु/ संध्याकाळी खारघर आणि नंतर मुंबईत शिवाजी पार्क मैदानावर घेणार प्रचारसभा
- केंद्र सरकार आदिवासी समुदायाला संसाधनापासून दूर ठेवत असल्याचा राहुल गांधी यांचा नंदुरबारच्या प्रचारसभेत आरोप
- यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचा राज्यस्तरीय पुरस्कार यंदा ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंग पवार यांना जाहीर

**आणि**

- भाजपाचे ज्येष्ठ नेते आणि माजी खासदार हरिश्चंद्र चव्हाण यांचं निधन

**<><><><><>**

राज्यविधानसभा निवडणुकीच्या प्रचारासाठी येत्या सोमवारपर्यंतच वेळ राहिल्यानं सर्व पक्षांनी प्रचाराचा धडाका लावला आहे. मतदारांना आकर्षित करण्यासाठी विविध आश्वासनं देण्यात येत आहेत तसंच एकमेकांवर आरोप प्रत्यारोपांच्या फैरी झाडल्या जात आहेत. भाजपाचे ज्येष्ठ नेते आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज राज्यात तीन ठिकाणी सभा घेणार आहेत. छत्रपती संभाजी नगरमधे मोदी यांची सभा सुरु आहे.

महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ मोदी आज पनवेलजवळ खारघर इथं तसंच मुंबईत शिवाजी पार्कवर सभा घेणार आहेत.

केंद्रीय मंत्री नितिन गडकरी यांची आज धाराशिव जिल्ह्यात नळदुर्ग इथं सभा झाली. सोलापूर आणि सांगली इथेही ते प्रचारसभा घेणार आहेत. काँग्रेस नेते राहुल गांधी यांची सभा नंदुरबार इथं झाली. नंतर ते नांदेड इथे प्रचारसभा घेणार आहेत. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे आज इगतपुरी आणि पुणे इथे प्रचारसभा घेत आहेत.

**<><><><><>**

ही विधानसभा निवडणूक जनतेच्या भवितव्याचा निर्णय करणारी निवडणूक आहे, असं प्रतिपादन भाजपा नेते, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी केलं. धाराशिव जिल्ह्यातल्या तुळजापूर मतदारसंघातल्या प्रचारसभेत ते आज बोलत होते. देशातली गरिबी, बेरोजगारी दूर व्हायला हवी, स्मार्ट शहरांप्रमाणेच स्मार्ट खेडी उभारली गेली पाहिजेत, देश पाच ट्रिलिनय अर्थव्यवस्था बनला पाहिजे तरच देश विश्वगुरू होईल, असं गडकरी म्हणाले. महायुतीच्या दहा वर्षात धाराशिव जिल्ह्याच्या विकासासाठी सहा हजार कोटी रुपये निधी दिला, तुळजापूर तीर्थक्षेत्र म्हणून विकसित होत आहे, असं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

केंद्र सरकारच्या धोरणनिर्मितीत आदिवासी अधिकाऱ्यांना मर्यादित अधिकार असून आदिवासी समुदायाला संसाधनापासून दूर ठेवलं जातं, असा आरोप काँग्रेसचे ज्येष्ठ नेते राहुल गांधी यांनी केला. ते आज नंदुरबार इथं प्रचारसभेत बोलत होते. देशात आदिवासींची लोकसंख्या ८ टक्के आहे, मात्र त्यांना सोयी सुविधा नाकारल्या जातात. ही परिस्थिती बदलायची असेल तर जातनिहाय जनगणना

करावी लागेल, असं गांधी म्हणाले. प्रत्येक समुदायाच्या संख्येनुसार त्यांची भागीदारी सुनिश्चित केली जाईल, आरक्षणाची ५० टक्क्याची मर्यादा काढून टाकली जाईल, शेतकऱ्यांचं तीन लाखापर्यंतचं कर्ज माफ केलं जाईल, महालक्ष्मी योजने अंतर्गत महिलांना दरमहा तीन हजार रुपये दिले जातील, २५ लाखापर्यंतचा आरोग्य विमा दिला जाईल, अडीच लाख सरकारी नोकऱ्या दिल्या जातील, अशी आश्वासनं राहुल गांधी यांनी दिली.

राहुल गांधी प्रत्येक सभेत संविधानाची प्रत दाखवतात यावरून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलेल्या टीकेला गांधी यांनी या सभेत प्रत्युत्तर दिलं. महायुतीच्या काळात राज्यातले उद्योग प्रकल्प दुसऱ्या राज्यात नेण्यात आले असून ५ लाख रोजगार हिसकावले गेल्याचा आरोप राहुल गांधी यांनी केला. राज्यातल्या जनतेला रोजगार मिळावा, अधिकारांचं संरक्षण व्हावं, यासाठी महाविकास आघाडी काम करेल असं ते म्हणाले.

**<><><><><>**

रत्नागिरी जिल्ह्यातल्या पाच विधानसभा मतदारसंघांमधले ८५ वर्षांपेक्षा अधिक वय असलेले ३ हजार ५८३ मतदार आणि ५९२ दिव्यांग मतदारांसाठी आजपासून गृहमतदानाची प्रक्रिया सुरू झाली आहे. रत्नागिरी विधानसभा मतदारसंघात कुवारबाव इथे राहणाऱ्या ९२ वर्षं वयाच्या मतदार जयश्री नाईक यांनी गृहमतदानाच्या सुविधेचा लाभ घेऊन मतदानाचं कर्तव्य बजावलं. तसंच ८८ वर्षांचे शांताराम देशपांडे यांनीही गृहमतदानाच्या सुविधेचा लाभ घेतला. 'निवडणूक आयोगाने गृहमतदानाची सोय केल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केलं....

**होल्ड--बाईट--(शांताराम देशपांडे)**

**<><><><><>**

हिंगोली जिल्ह्यातल्या कळमनुरी विधासभा मतदारसंघाचे आमदार संतोष बांगर यांच्याविरुद्ध आचारसंहिता भंगाचा दुसरा गुन्हा दाखल झाला आहे. बांगर यांनी मतदारांना पैसे वाटल्याचा आरोप शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या कार्यकर्त्याने केला आहे.

याच भागातल्या वाकोडी गावात काल मविआचे उमेदवाराच्या प्रचारासाठी गेलेल्या वाहनांवर दगडफेक करणं तसंच कार्यकर्त्यांना मारहाण करण्याच्या तक्रारीवरून आठ ते दहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**<><><><><>**

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं ‘आढावा विधानसभा मतदारसंघांचा’ हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी अस्मिता वाहिनीसह प्रादेशिक वृत्त विभागाच्या Youtube वरुन प्रसारित केला जात आहे. या कार्यक्रमात आज सोलापूर जिल्ह्यातल्या मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

**<><><><><>**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या वतीने दिला जाणारा यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय पुरस्कार यंदा ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंग पवार यांना जाहीर झाला आहे. येत्या २५ नोव्हेंबरला मुंबईत यशवंतराव चव्हाण सेंटर इथे ज्येष्ठ नेते

शरद पवार यांच्या हस्ते हा पुरस्कार दिला जाणार आहे. दोन लाख रुपये रोख आणि मानपत्र असं या पुरस्काराचं स्वरुप आहे.

**<><><><><>**

देशाचे पहिले प्रधानमंत्री दिवंगत पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जयंतीनिमित्त देश आदरांजली वाहत आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी नेहरु यांना आदरांजली वाहणारा संदेश समाजमाध्यमावर प्रसिद्ध केला आहे. महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी मुंबईत राजभवन इथं पंडित नेहरुंच्या प्रतिमेला पुष्पांजली अर्पण करुन अभिवादन केलं. राजभवनातल्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी देखील पंडित नेहरु यांना आदरांजली वाहिली आहे.

पंडित नेहरु यांच्या जन्मदिनी बालदिन साजरा केला जात असून विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे.

**<><><><><>**

झारखंडमध्ये विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात १५ जिल्ह्यांतल्या ४३ मतदारसंघांमध्ये काल ६६ पूर्णांक ५१ शतांश टक्के मतदान झालं. सर्वाधिक म्हणजे ७९ टक्क्यांपेक्षा जास्त मतदान खरसावन इथं नोंदवलं गेलं.  काल ६८३ उमेदवारांचं राजकीय भवितव्य मतपेटीत बंद झालं. सरायकेलामधून भाजपचे माजी मुख्यमंत्री चंपाई सोरेन, रांचीमधून राज्यसभा खासदार आणि झामुमोचे उमेदवार महुआ माजी, लोहरदगामधून काँग्रेसचे रामेश्वर ओराव, जमशेदपूर (पश्चिम) मधून जनता दल (युनायटेड)चे सरयू राय तसंच, इचागढ मधून AJSU चे हरे लाल महतो

अशा महत्त्वाच्या उमेदवारांचं भवितव्य या निवडणुकीत ठरणार आहे. २० नोव्हेंबर रोजी दुसऱ्या टप्प्यातलं मतदान होणार असून २३ नोव्हेंबर रोजी मतमोजणी होणार आहे.

**<><><><>**

घाऊक किंमत निर्देशांकावर आधारित चलनवाढीचा दर ऑक्टोबर महिन्यात २ पूर्णांक ३६ शतांश टक्के झाला आहे. सप्टेंबर महिन्यात हा दर १ पूर्णांक ८४ होता टक्के होता. खाद्यपदार्थ, कांदे, बटाट्याच्या किंमती वाढल्यानं चलनवाढीचा दर वाढला.

**<><><><>**

१० राज्यांतल्या ३१ विधानसभा मतदारसंघ आणि केरळातल्या वायनाड लोकसभा मतदारसंघातल्या पोटनिवडणुकीसाठीही काल मतदान झालं. यामध्ये राजस्थानातले सात, पश्चिम बंगालमधले सहा, आसाममधले पाच, बिहारमधले चार, कर्नाटकातले तीन आणि मध्य प्रदेशातल्या दोन जागांचा समावेश आहे. याशिवाय केरळ, छत्तीसगड, गुजरात आणि मेघालयमध्ये विधानसभेच्या प्रत्येकी एका जागेसाठी काल मतदान  झालं. केरळच्या वायनाड लोकसभा मतदारसंघासाठी झालेल्या पोटनिवडणुकीत सुमारे ६५ टक्के मतदान झालं.

**<><><><>**

भाजपाचे ज्येष्ठ नेते आणि माजी खासदार हरिश्चंद्र देवराम चव्हाण यांचं आज सकाळी नाशिक इथे त्यांच्या राहत्या घरी दीर्घ आजाराने निधन झालं. ते ७३ वर्षांचे होते. पेठ-सुरगाणा या मतदारसंघातून अपक्ष म्हणून उतरलेले चव्हाण आमदार

म्हणून निवडून आले. त्यानंतर आधी काँग्रेसकडून निवडणूक लढवत ते खासदार झाले. भारतीय जनता पक्षात प्रवेश केल्यानंतरही ते सलग दोन वेळा खासदार म्हणून निवडून आले होते. आपल्या राजकीय कारकिर्दीत त्यांनी जिल्हा परिषदेतली विविध पदंही भूषवली होती. त्यांच्या पार्थिवावर आज दुपारी चार वाजता सुरगाणा तालुक्यातल्या प्रतापगड इथे अंत्यसंस्कार केले जाणार आहेत.

**<><><><><>**

म्हाडाच्या पुणे मंडळाच्या ६ हजार २९४ सदनिकांच्या विक्रीसाठी ऑनलाईन अर्ज सादर करण्याची मुदत १० डिसेंबरपर्यंत वाढवण्यात आली आहे. ही संगणकीय सोडत असून यात पुणे, पिंपरी चिंचवड तसंच सोलापूर, कोल्हापूर आणि सांगली जिल्ह्यातल्या विविध गृहनिर्माण योजनांमधल्या सदनिकांचा समावेश आहे. पुढच्या वर्षी ७ जानेवारी रोजी सकाळी दहा वाजता ही सोडत काढली जाईल.